# पुण्य नगरी

सातारा ◆ शुक्रवार, २९ नोव्हेंबर २०१९ | वर्ष : १६ | अंक : २३७ | पाने १२+४=१६ ★ किंमत : ₹ ५.००




प्राचार्य विजयसिंह सावंत यांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# रयतच्या लाईफ मेंबर बोर्ड अध्यक्षपदी विजयसिंह सावंत

**कोरेगाव** : रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ मेंबर बोर्डाच्या अध्यक्षपदी डी. पी. भोसले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

डॉ. सावंत हे रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल सदस्य तसेच विद्याप्रसारक मंडळ कोरेगावचे सचिव म्हणूनही काम पाहत आहेत. कोरेगाव एज्युकेशन सोसायटीच्या वाघोली येथील शंकरराव जगताप महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आणि शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनचे ते खजिनदार आहेत.

समितीचे चेअरमन आ.डॉ. विश्वजित कदम, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, उपप्राचार्य डॉ. एस. डी. जाधव आदींनी डॉ. सावंत यांचे अभिनंदन केले.


डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव